30

38

Imp S.

# मुंबई विद्यापीठ

कविक/ ३६२ /२००३

दिनांक : २९ जुलै २००३

**परिपत्रक :**

संचालक / विविध विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ, प्राचार्य, सर ज जी वास्तुशास्त्र महाविद्यालय, प्राचार्य / संचालक मान्यता प्राप्त पदव्युत्तर संस्था आणि प्राचार्य सर्व संलग्नित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अभियांत्रिकी, / औषधनिर्माण शास्त्र व वास्तुशास्त्र, फाईन आर्टस महाविद्यालये / संस्था, तसेच उपकुलसचिव आस्थापना विभाग, उपकुलसचिव शिक्षक नियुक्ती विभाग व उपकुलसचिव संलग्नता / घटक महाविद्यालये विभाग यांना माहिती व योग्यत्या कार्यवाहीसाठी रवाना. व्यवस्थापन

कुलसचिवांकरिता

---

इतर मागासवर्गीय जातीमधील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गट (Creamy Layer) वगळून आरक्षणाचे फायदे देण्यासाठी निकष निश्चित करण्याबाबत ..........

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,

शासन निर्णय क्रमांक : सीबीसी १०/२००१/प्रक १११/मावक-५,

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२,

दिनांक : २९ मे, २००३

वाचा : (१) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक सीबीसी-१०९४/प्रक ८६/मावक-५, दिनांक १६ जून १९९४.

(२) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी-१०९४/प्रक ८६/मावक-५, दिनांक ५ जून १९९७.

(३) शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, उतर मागासवर्ग आणि विशेष मागासवर्ग कल्याण विभाग, क्रमांक सीबीसी-१०९४/प्रक ८६/मावक-५, दिनांक ६ जून २०००.

**प्रस्तावना** : शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक सीबीसी-१०९४/प्रक ८६/मावक-५, दिनांक १६ जून १९९४ अन्वये महाराष्ट्र राज्यातील इतर मागासवर्ग, भटक्या जमातीतील धनगर व वंजारी व त्यांच्या तत्सम जाती या प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती / गट वगळून आरक्षणाचे फायदे देण्याबाबत निकष निश्चित करण्यात आले होते व क्रिमिलेअरसाठी वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. १.०० लाख इतकी निश्चित करण्यात आली होती. त्यानंतर दि. ५ जून १९९७ च्या शासन निर्णयान्वये क्रिमिलेअरसाठी उत्पन्नाची मर्यादा रु. १.०० लाखावरुन रु. २.०० लाख इतकी वाढविण्यात आली होती. सदर उत्पन्न मर्यादा दि. ६ जून २००० च्या शासन निर्णयान्वये पुढील आदेशापर्यंत कायम ठेवण्यात आलेली होती.

केंद्र शासनाच्या दि. ८/९/१९९३ च्या आदेशातील सूचनानुसार दर तीन वर्षांनी रुपयाचे मूल्य विचारात घेऊन क्रिमिलेअरची उत्पन्नाची मर्यादा वाढविण्याची तरतूद आहे. त्यानुसार सध्या असलेली रु. २.०० लाख उत्पन्नाच्या निकषाची मर्यादा बदलण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :

औद्योगिक कामगारांकरिता अखिल भारतीय ग्राहक किंमती निर्देशांक तसेच आयकर Cost Inflation Index वरुन रुपयाचे मूल्य विचारात घेऊन क्रिमिलेअरसाठी असलेली उत्पन्न मर्यादा ही रु. २.०० लाखांवरुन रु. ३.०० लाख इतकी वाढविण्यासशासन मान्यता देत आहे. ज्यांचे उत्पन्न मागील सलग तीन वर्षामध्ये प्रत्येक वर्षी रु. ३.०० लाखापेक्षा जास्त आहे अशांना आरक्षणाचा लाभ मिळणार नाही. रु. ३.०० लाख ही मर्यादा पुढील आदेशापर्यंत अंमलात राहील हे लक्षात घेता शासन निर्णय क्रमांक सीबीसी-१०९४/प्रक्र ८६/मावक-५, दिनांक ५ जून १९९७, व दिनांक ६ जून २००० मध्ये क्रिमिलेअरसाठी ज्या-ज्या ठिकाणी रु. २.०० लाख, उत्पन्नाची मर्यादा नमूद आहे, त्या-त्या ठिकाणी आता रु. ३.०० लाख उत्पन्न मर्यादा गृहित धरुन कार्यवाही करावी.

२ उत्पन्नाचे निकष महाराष्ट्र राज्यातर्फे दिल्या जाणा-या सवलतींकरिता लागू आहेत.

३. केंद्र शासनाचे आरक्षणविषयक फायदे घेताना उन्नत व प्रगत व्यक्ती /गट याबाबतचे जे निकष केंद्राने लागू केले आहेत ते निकष केंद्र शासनाने महाराष्ट्राशी संबंधित जी इतर मागासवर्गीयांची यादी निश्चित केली आहे त्यांना लागू राहतील.

४. सदर आदेश या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येतील.

महाराष्टाचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
( ना. ना. भडीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र -१, मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र -२, नागपूर
सर्वविभागीय आयुक्त,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा / अपील शाखा, मुंबई (पत्राने),
संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
सर्व मंत्रालयीन विभाग,
त्यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त आदेश त्यांनी त्यांचा अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणावेत
सर्व जिल्हा दंडाधिकारी
सर्व उप विभागीय अधिकारी (महसूल),
सर्व उप जिल्हाधिकारी,
त्यांना विनंती करण्यात येते की उपरोक्त आदेश त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व तहसिलदारांच्या निदर्शनास आणावेत
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व तालुका कार्यकारी दंडाधिकारी,
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी,
सर्व कार्यासने, सा. न्या. सा. का. की. व वि. स. विभाग,
निवडनस्ती, का - मावक - ५

---------------